

## ✲ विद्यमान संचालक मंडळ ✲

**संस्थापक : मा. खा. स्व. किसनरावजी बाबुराव बाणखेले**

| | नाव | पद | मोबाईल नं. |
|---|---|---|---|
| १) | **मा. ॲड. निवृत्ती मुरलीधर काळे** (B.Sc.,LLB, MBA) | अध्यक्ष | ९८२२०८६२७७ |
| २) | **मा. श्री. नितीन मधुकर लोणारी** | उपाध्यक्ष | ८२३७०८१८१८ |
| ३) | **मा. श्रीमती मथुराबाई किसनराव बाणखेले** | संचालिका | ७७०९७११९७७ |
| ४) | **मा. स्व. महादेव उर्फ तात्यासाहेब रखमाजी गुंजाळ** (दि.१८/१०/२०२० पर्यंत) | संचालक | -- |
| ५) | **मा. श्री. मनसुखलाल पुखराज भंडारी** | संचालक | ९१७५००९९९१ |
| ६) | **मा. स्व. प्रल्हाद नानाभाऊ बाणखेले** (दि.७/३/२०२१पर्यंत) | संचालक | -- |
| ७) | **मा. श्री. जगदीश दशरथ फुलसुंदर** | संचालक | ९७६६५४८३०३ |
| ८) | **मा. श्री. अशोक बन्सीलाल गांधी** | संचालक | ९८८११२३५५१ |
| ९) | **मा. सौ. विमलताई वसंतराव थोरात** | संचालिका | ९८६०७४३७९७ |
| १०) | **मा. सौ. सुनिताताई बबनराव साकोरे** | संचालिका | ९४२२०३३२२० |
| ११) | **मा. श्री. सचिन सुभाष कांकरिया** | संचालक | ९४२२०७८७८० |
| १२) | **मा. श्री. नारायण धोंडीबा गाढवे** | संचालक | ९९६०२३६७०० |
| १३) | **मा. डॉ. सचिन भागुजी कांबळे** | संचालक | ९८९०८८६६९१ |
| १४) | **मा. डॉ. जैन्नुद्दीन रमजान मुल्ला** (Ph.D.,CA) | तज्ञ संचालक | ९०७०२१५१२० |
| १५) | **मा. श्री. अशोक सावळकर** (दि.३१/०३/२०२१ पर्यंत) | मुख्य कार्यकारी अधिकारी | ९८३३९४९४४० |
| १६) | **मा. श्री. डी. एन. सुरम** (दि.१९/०६/२०२१ पासून) | मुख्य कार्यकारी अधिकारी | ९८५००९४०८१ |
| १७) | **मा. श्री. प्रदिप जयवंत मोरे** | उपमुख्य कार्यकारी अधिकारी | ९४२२२७४६३९ |



**❊ परिशिष्ट 'अ' ❊**

१. बँकेचे नाव : **लाला अर्बन को-ऑप. बँक लि. नारायणगांव**

२. नोंदणीकृत पत्ता : ''फुलसुंदर सुपर मार्केट'', पुणे-नाशिक हायवे, नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे. पिन कोड - ४१०५०४

३. नोंदणी क्रमांक व दिनांक : पीएनए/बीएनके/२३५, दि. १२/८/१९७४

४. रिझर्व्ह बँकेचा परवाना क्र. व दिनांक : एसीडी/एमएच/१७७ पी., दि. १७/१/१९८०

५. कार्यक्षेत्र : पुणे जिल्हा

६. ऑडिट वर्ग : ''अ''

७. सभासद संख्या : नियमीत - १३२६५ नाममात्र १७८१

८. वसूल भागभांडवल : रु. १४.०१ कोटी

९. गंगाजळी : रु. ३२.७६ कोटी

(आकडे रु. कोटीत)

| ठेवी | | कर्जे | |
|---|---|---|---|
| बचत | ४७.३९ | तारणी | १९२.१६ |
| चालू | २०.७४ | विनातारणी | - |
| मुदत | २७६.०१ | | |
| एकूण ठेवी | ३४४.१४ | एकूण कर्जे | १९२.१६ |

| **बाहेरील कर्ज** | **नाही** | **एकूण गुंतवणूक** | १७१.७७ |
|---|---|---|---|
| नफा करपूर्व व तरतुद पूर्व | ८.०१ | अग्रक्रम क्षेत्र कर्ज | ९८.२२ |
| नफा करोत्तर | २.५१ | दुर्बल घटक कर्ज | २४.२७ |
| खेळते भांडवळ | ३८९.३३ | अग्रक्रम क्षेत्र कर्जाचे येणे कर्जाशी प्रमाण | ५४.९०% |
| एकूण सेवक | ९६ | दुर्बल घटक कर्जाचे अग्रक्रम क्षेत्राशी प्रमाण | १२.६३% |
| अधिकारी | २८ | एन.पी.ए प्रमाण ढोबळ | ८.३३% |
| लेखनिक व शिपाई | ६८ | एन.पी.ए प्रमाण निव्वळ | २.८९% |



## - वार्षिक सर्व साधारण सभा नोटीस -

**(फक्त सभासदांकरिता)**

**लाला अर्बन को. ऑप. बँक लि. नारायणगांव** या बँकेची सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **बुधवार दि. २९ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी १०.३० वा. ''लाला अर्बन को-ऑप. बँक लि. नारायणगाव, मुख्य कार्यालय, नारायणगाव''**, ता. जुन्नर, जि. पुणे येथून मा. अध्यक्ष **अॅड. श्री. निवृत्ती मुरलीधर काळे** यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करणेसाठी मा. सहकार आयुक्त यांचे आदेशानुसार बँकेने दिलेल्या ऑनलाईन लिंकवर व्हिडीओ व ऑडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सभासदांनी ऑनलाईन लिंकद्वारे सभेत सहभागी व्हावे, ही नम्र विनंती.

### - सभेपुढील विषय -

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि. ०७/०३/२०२१ रोजीचे वृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २०२०-२०२१ अखेरच्या संचालक मंडळाच्या बँकेच्या कार्याबद्दलचा वर्ष अखेरच्या अहवालावर विचार करणे व तो स्विकृत करणे.
३. दि. ३१ मार्च २०२१ चा लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व तो स्विकृत करणे.
४. लेखापरिक्षकांच्या सन २०२०-२०२१ चे लेखापरिक्षण अहवालावर विचार करणे व स्विकृत करणे.
५. सन २०२०-२१ वर्षाचे नफा वाटणीस मान्यता देणे. (लाभांश वाटपाबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे लेखी मान्यतेस पात्र राहून)
६. सन २०२०-२०२१ च्या अंदाजपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२१-२२ वर्षाकरीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि प्रगतीच्या तक्त्याची माहिती घेणे.
७. सन २०२१-२०२२ या वर्षासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांचे केलेल्या नियुक्तीस मान्यता देणे.
८. सन २०२२-२३ करीता अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणुक करणेकरिता संचालक मंडळास अधिकार देणे.
९. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
१०. सन २०२०-२१ या वर्षात शासनाचे एकरकमी परतफेड योजनेअंतर्गत तडजोड केलेल्या कर्जाची माहिती घेणे.
११. बँकेच्या पोटनियम दुरुस्तीस मंजुरी देणे.
१२. ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती मान्य करणे.
१३. बँकेच्या मयत कर्जदारांना मृत्युपश्चात ६ महिन्यात कर्जखाते बंद केल्यास अशा कर्जखात्यावर व्याजदरात सवलत देणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
१४. मा.अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन
**डी. एन. सुरम**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**स्थळ : नारायणगांव**
दिनांक : १४/०९/२०२१

**विशेष सूचना :** १) सदरची सभा ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. २) वर्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयांसंबंधी काही प्रश्न अगर सुचना असल्यास त्या दि.२३/०९/२०२१ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयात लेखी आणून द्याव्यात. ३) सन २०२०-२०२१ चा संपूर्ण अहवाल www.lalaurbanbank.in या बँकेच्या संकेतस्थळावर सभासदांसाठी प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. ४) सभासदांनी आपल्या जवळच्या शाखेत मेल आयडी/व्हॉटस्अप नंबर/मोबाईल नंबर द्यावा. जेणेकरून आपल्याला ऑनलाईन सभेची लिंक पाठवणे शक्य होईल. ५) ऑनलाईन लिंक संदर्भात काही तांत्रिक अडचणी आल्यास सभासदांनी नजीकच्या शाखेत जाऊन ऑनलाईन सभेत सहभाग घ्यावा. ६) सभासदांना वार्षिक अहवाल नजीकच्या शाखेत उपलब्ध करून ठेवले आहेत.





## अध्यक्षीय मनोगत.....

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो

सप्रेम नमस्कार,

सर्वसामान्यांचा व समाजातील होतकरू लोकांचा आर्थिक विकास व्हावा या धैर्याने सन १९७४ साली आदरणीय खासदार स्व.किसनरावजी बाणखेले यांनी लाला बँकेची स्थापना केली. सर्वसामान्यांची बँक हा उददेश डोळयासमोर ठेवून बँकेनी ४७ वर्ष यशस्वी वाटचाल केलली आहे. अशीच वाटचाल पुढे सरू राहण्यासाठी आपण सर्वांनी बँकेला दिलेले सहकार्याबददल मी आपले सर्वाचे ऋण व्यक्त करतो व बँकेचा ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफा तोटा पत्रक आपणापुढे सादर करतो.

सहकारी बँकांचा कामकाजामध्ये रिझर्व्ह बँकेच्या धोरणात सतत बदल होत असून आर्थिक कामकाज करणे आव्हानात्मक झालेले आहे. तसेच सन २०१९ पासून कोरोना महामारीचे सावट संपूर्ण जगावर घोंगावत आहे अशा परिस्थितीत बँकेला अनेक निर्बंध व मर्यादा पाळून काम करणे मोठे आव्हान आहे. परंतू या सर्व गोष्टीचा सामना करून येणाऱ्या अडीअडचणी वर मात करून माझे सर्व सहकारी संचालक व कर्मचारी यांनी एकत्रित प्रयत्न करून आपल्या बँकेच्या सर्व सभासद, खातेदार व ग्राहक वर्गाला कोरोनाच्या महासंकटात तप्तर सेवा देण्याचा प्रयत्न बँकेने केलेला आहे. या सर्वांना कोरोना योध्दे म्हणले तर वावगे ठरणार नाही.

या कालावधीत बँकेची प्रगती उत्तरोत्तर वाढत असून बँकेची आर्थिक स्थिती पाहता ३१ मार्च २०२१ अखेर ठेवी रू.३४४ कोटी, एकूण कर्जे रू.१९२ कोटी, गुंतवणूक रू.१७१ कोटी इतके आहे. बँकेने कर्ज वसूलीतून चालू आर्थिक वर्षात नेट एन.पी.ए २.८९ टक्के एवढा राखला असून बँकेला रू.२.५१ कोटी इतका नफा झालेला आहे. तसेच सदरच्या काळात आर्थिक मंदी असताना सुध्दा बँकेला रोखे खरेदी-विक्रीतून रू.४ कोटी ४९ लाख एवढा विक्रमी नफा झालेला आहे. ठेवी, कर्जात चांगल्या प्रकारची वाढ केलेली असून कर्ज वसूली ही मोठया प्रमाणात केलेली आहे त्याचे फळ म्हणजे बँकेला सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रू.२.५१ कोटी इतका नफा झालेला आहे.

कोरोना महामारीच्या संकट काळात बँकेच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी मेडिकल पॉलीसी उतरविल्यामुळे कोरोना बाधीत कर्मचाऱ्यांना व त्यांचे कुटूबियांना मोठा लाभ झालेला आहे व ही सुविधा सतत चालू ठेवण्याचा मानस आहे. तसेच ज्या सभासदांचे एक हजार पेक्षा जास्त शेअर्स आहेत अशा सर्व सभासदांसाठी सभासद अपघात विमा रू.२ लाखाचा उतरविलेला आहे. या योजनेचा फायदा बँकेचे सहा सभासद अपघातात मुत्यू झाले अशा सभासदांच्या वारसाला रू.२ लाखाची मदत विमा कंपनी कडून प्राप्त करून दिलेली आहे.

आपल्या बँकेच्या मुख्य कार्यालयासह एकूण १४ शाखा असून ६ वास्तू या स्वमालकीच्या आहे. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेत सांगितले प्रमाणे आपल्या बँकेची जुनी शाखा बाजारपेठ शाखेसाठी नविन जागा घेतलेली असून त्याचे काम प्रगतीपथावर असून लवकरच बाजारपेठ शाखा स्वःमालकीत जाणार आहे. तसेच आळंदी, काळेवाडी शाखा नविन जागेवर स्थलांतरीत केल्यामुळे तेथील व्यवसाय वाढीसाठी मदत होणार आहे. त्याचप्रमाणे रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनेनुसार बँकेने डाटा सेंटर प्रमाणेच डी.आर साईट सुरू केलेली आहे. बँकेकडे सभासदांनी स्वः खुशीने आणांच्या स्मारकासाठी दिलेली जमा असणारी रक्कम रू.११,११,०००/- सभासदांच्या वतीने नुकतीच स्मारक समितीकडे सोपवली आहे. आपले आण्णांवर असणाऱ्या प्रेमामुळेच या सर्व गोष्टी घडून आलेल्या आहे.

आपणा सर्वांचे सहकार्य, स्व.किसनरावजी बाणखेले, स्व.तात्यासाहेब गुंजाळ व स्व.प्रल्हादभाऊ बाणखेले यांनी बँकेच्या प्रगतीसाठी सतत घेतलेला ध्यास आणि त्यांच्या विचारांची दिशा समोर ठेवून बँकेचे कामकाज करणारे सर्व माजी अध्यक्ष, माजी उपाध्यक्ष, सर्व आदरणीय संचालक मंडळ व कर्मचारी वर्ग हे सर्व जण आजर्यंतच्या बँकेच्या प्रगतीमधील घटक आहेत याची पूर्ण जाणीव मला आहे. या सर्वांच्या सहकार्याच्या आणि स्व.आण्णा व स्व. तात्यांच्या आर्शिवादाच्या पुंजीवर या पुढेही बँकेची प्रगती होत राहील अशी मला खात्री आहे.

दि.३१.०३.२०२१ अखेरचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रके आपणापुढे स्विकृतीसाठी सादर करत आहे. आपण त्यास मान्यता द्यावी ही नम्र विनंती.

आपला स्नेहांकित,

**ॲड. निवृत्ती मुरलीधर काळे**

अध्यक्ष

दि. १४/०९/२०२१



# ४७ वा वार्षिक अहवाल

**सन्माननीय सभासद बंधू आणि भगिनींनो,**

बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा **४७ वा** वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक आपल्या समोर सादर करण्यास मला मनस्वी आनंद होत आहे.

आपल्या बँकेचे संस्थापक लोकनेते **मा. खा. स्व. किसनरावजी बाणखेले** यांच्या स्मृतीस अभिवादन करुन आपल्या बँकेच्या ४७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने आपणा सर्वांचे स्वागत करतो.

आर्थिक क्षेत्रामध्ये वाटचाल करीत असताना रिझर्व बँकेचे आर्थिक धोरण, नागरी सहकारी बँकांवर लादले जात असलेले कडक निर्बंध, देशांतर्गत असलेली मंदीसदृश्य परिस्थिती व कोरोना अशा अनेक आव्हानांवर मात करुन आपल्या बँकेने ३१ मार्च २०२१ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षात समाधानकारक प्रगती केली आहे. याचे सर्व श्रेय संचालक मंडळ सदस्य, सभासद, ग्राहक व कर्मचारी वर्गाला द्यावे लागेल.

## ❋ वार्षिक सर्वसाधारण सभा :

गेल्या वर्षी ३१ मार्च २०२० अखेर संपलेल्या ४६ व्या आर्थिक वर्षाचा वार्षिक वृत्तांत व हिशेब पत्रके मंजूर करण्यासाठी रविवार दिनांक ०७ मार्च २०२१ रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली आणि या सभेमध्ये त्या आर्थिक वर्षात केलेल्या कार्याचा अहवाल सभासदांपुढे ठेवण्यात येवून सर्वसंमतीने सर्व विषयांना मंजूरी देण्यात आली. बँकेच्या झालेल्या प्रगतीबद्दल सभासदांनी समाधान व्यक्त केले.

## ❋ संचालक मंडळ :

अहवाल वर्षात मा. संचालक मंडळाच्या एकूण १७ सभा आणि उपसमितीच्या १६ अशा एकूण ३३ सभा झाल्या. या सर्व सभा रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जाहीर केलेल्या धोरणांना आणि विषयांना अनुसरून होत्या. यासभांमध्ये विषय पत्रिकेवरील विषय सर्व संमतीने मंजूर करण्यात आले.

## ❋ सभासद :

गेल्यावर्षी ३१ मार्च २०२० अखेर नोंदविलेले सभासद १२८७६ इतके होते. अहवाल वर्षात त्यामध्ये ५११ ने वाढ व राजीनामा व इतर कारणाने त्यात १२२ ची घट होऊन ३१ मार्च २०२१ अखेर नोंदवलेले सभासद १३२६५ इतके झाले आहेत.

## ❋ भाग भांडवल :

आपल्या बँकेचे अधिकृत भागभांडवल रु.२० कोटींचे आहे. दिनांक ३१.०३.२०२० अखेर एकूण वसूल भागभांडवल रु १३.९२ कोटी इतके होते. अहवाल सालात त्यामध्ये रु. ०.६७ कोटी इतकी वाढ होऊन रु. ०.५८ कोटी भागाची रक्कम परत केली असून दिनांक ३१.३.२०२१ रोजी रु. १४.०१ कोटी इतके झाले.

## ❋ स्वनिधी :

दिनांक ३१.३.२०२० अखेर एकूण स्वनिधी रु.२७.२४ कोटी इतका होता. त्यात रु. ५.५२ कोटीची वाढ होऊन अहवाल वर्षअखेरीस एकूण निधी रु. ३२.७६ कोटी इतका झाला आहे. मा. संचालक मंडळाने यावर्षी निव्वळ नफा रु.२.५१ कोटी वेगवेगळया निधींना वर्ग करण्याची शिफारस केलेली आहे. नफा वाटपास मंजुरी मिळाल्यानंतर बँकेचा एकूण निधी रु. ३३.३९ कोटी इतका असणार आहे. हा स्वनिधी बँकेच्या सक्षमतेस, स्थैर्यास आणि मजबुतीस बळकटी देणारा आहे.

### ❋ ठेवी :

दिनांक ३१ मार्च २०२० अखेर बँकेच्या एकूण ठेवी रु.३१०.७९ कोटी इतक्या होत्या. अहवाल वर्षात या ठेवींमध्ये रु.३३.३५ कोटी इतकी वाढ होऊन वर्ष अखेरीस त्या रु. ३४४.१४ कोटी इतक्या झालेल्या आहेत.

### ❋ ठेवींवरील विमा :

आपली बँक आर्थिक दृष्ट्या सक्षम व बळकट तर आहेच पण आपल्या ठेवीदारांच्या ठेवींच्या सुरक्षिततेची ती सदोदित हमी देते व काळजी घेते. रिझर्व्ह बँकेचेच एक अंग असलेल्या ठेव विमा सरंक्षण महामंडळाकडे म्हणजेच The Deposit Insurance and Credit Guarantee Corporation तर्फे रु.५ लाखापर्यंत ठेव असणाऱ्या सर्व ठेवीदारांचा विमाहप्ता दर सहामाहीस उतरविला जातो आणि तो या ठेव विमा सरंक्षण महामंडळाकडे आगावू (In Advance) पाठविला जातो. अहवाल वर्षात असा एकूण विमा हप्ता रु. ४१.८६ लाख पाठविलेला असून पुढील वर्षाचा रु.२२.५१ लाख विमा सहामाही हप्ता अदा केलेला आहे.

### ❋ भांडवल पर्याप्तता :

'भांडवल पर्याप्तता' ही बँकेच्या मालमत्तेच्या (Assets) जोखिमीवर अवलंबून असते तर 'भांडवल पर्याप्ततेच्या' प्रमाणावर बँकेची आर्थिक बळकटी अवलंबून असते. रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार बँकेच्या भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण किमान **९%** असावे असे बंधन आहे. बँकेच्या भांडवल पर्याप्ततेचे या वर्षाचे प्रमाण **१९.९४%** इतके उत्कृष्ट राखले आहे.

### ❋ गुंतवणूक व्यवस्थापन :

३१ मार्च २०२१ या आर्थिक वर्षअखेर बँकेने रु. १७१.७७ कोटी इतकी एकूण गुंतवणूक केली असून त्यापैकी रु.१३६.४७ कोटी ही गुंतवणूक रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार वैधानिक तरलता निधीच्या स्वरूपात (Statutary Liquidity Ratio) सरकारी रोख्यांमध्ये केलेली आहे. उर्वरीत गुंतवणूक रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, इतर मान्यताप्राप्त रोखे, राष्ट्रीयकृत व शेडयुल्ड सहकारी बँकांमध्ये केलेली आहे. सदर गुंतवणूक संचालक मंडळाने मंजूर केलेल्या गुंतवणूक धोरणाप्रमाणे केलेली असून ती करताना रिझर्व्ह बँकेने ठरवून दिलेले रोखता राखीव निधीचे (CRR) आणि वैधानिक तरलता निधीचे (SLR) प्रमाण सदोदित राखले आहे तसेच हे प्रमाण राखण्यामध्ये कदापीही उल्लंघन (Default) झालेले नाही. सरकारी रोख्यांमध्ये केलेल्या व्यापारात वर्षभरात **रु.४४९.७१ लाख** इतका नफा मिळविला आहे, तर एकूण गुंतवणूकीमध्ये **रु.१० कोटी १४ लाख** व्याजरूपाने उत्पन्न मिळविले आहे.

### ❋ कर्ज व्यवहार :

दि. ३१ मार्च २०२० अखेर बँकेचे येणे कर्ज **रु.१७५.७९** कोटी इतके होते. अहवाल वर्षात कर्ज व्यवहारात बँकेने एकूण रु.६९.९० कोटी कर्जवाटप केलेले आहे. तसेच चालू व थकीत खात्यांची रु.५३.५३ वसूली केलेली असून एकूण कर्ज येणे रक्कम रु.१९२.१६ इतके आहे. कर्जदार सभासदांना अर्थसहाय्य देताना त्यांना कर्जाची असलेली योग्य गरज, कर्ज ज्या व्यवसायासाठी घेतले त्या व्यवसायाची आर्थिक पोषकता, कर्जदाराचा प्रामाणिकपणा, दिलेल्या तारणाची सक्षमता, कर्जदाराचा संबंधित व्यवसायातील एकूण अनुभव आदी प्रकर्षाने पाहिले जाते. त्यानुसार योग्य रितीने कर्ज प्रस्ताव तयार केले जातात.

कर्जाचे वितरण झाल्यानंतर रिझर्व्ह बँकेच्या सूचनांनुसार त्यावर नियमितपणे नियंत्रण (Credit Monitoring) ठेवले जाते. कर्जदारांना कर्ज देतानाच या सर्व प्राथमिक गोष्टींची पडताळणी केल्याने बँकेच्या एन.पी.ए.चे प्रमाण २.८९% इतके राहिलेले आहे. तसेच प्राधान्य अग्रक्रम क्षेत्रातील व दुर्बल घटक क्षेत्रातील कर्जपुरवठा रिझर्व्ह बँकेने वेळोवेळी जाहीर केलेली धोरणे व निकषांनुसार केलेला आहे.

### ❋ लेखापरिक्षण :

आपल्या बँकेचे वैधानिक लेखापरिक्षण **मे. आर.आर. पिंगळे ॲण्ड कंपनी, पुणे** यांनी केलेले असून बँकेचे अंतर्गत व आवर्ती

लेखापरिक्षण **मे.जगताप ॲण्ड जगताप असो.** यांनी वेळोवेळी पूर्ण केलेले आहे. त्यांचे अहवाल बँकेला प्राप्त झालेले आहेत व संचालक मंडळ सभेपुढे वळोवेळी मांडण्यात आलेले आहेत. चालू आर्थिक वर्षामध्ये बँकेस ''अ'' वर्ग मिळाला आहे.

### ❋ जनता अपघात विमा :

अहवाल वर्षात बँकेने ज्या सभासदांचे नावावर रक्कम रु.१०००/- पेक्षा जास्त भाग आहेत, अशा सर्व सभासदांचा रु.२ लाखाचा ओरीएन्टल इन्शुरन्स कंपनी यांचेकडून सभासद जनता अपघात विमा एक वर्षासाठी उतरविलेला आहे. सदर योजनेचा फायदा सहा सभासदांच्या वारसदारांना मिळालेला आहे.

### ❋ कर्जाची थकबाकी आणि अनुत्पादकता :

'बँकेच्या सभासदांना त्यांच्या गरजांनुसार अर्थसहाय्य करणे' हा बँकेचा प्राथमिक हेतू आहे. 'कर्ज व्यवसाय' हाच बँकेचा प्रमुख व्यवसाय असल्याने अनेक वेळा बँकेची कर्जवसूली न झाल्याने निर्माण झालेली थकबाकी बँकेच्या अपेक्षित उत्पन्नावर आणि प्रस्तावित विकासावर विपरित परिणाम करू शकते. रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार अशा परिस्थितीत बँकेची आर्थिक स्थिती भरभक्कम राहण्यासाठी बँकेला मिळालेल्या उत्पन्न व नफ्यातून अशा थकबाकीची प्रमाणशीर तरतूद दरवर्षी करावी लागते. अहवाल वर्षात बँकेच्या विशेष वसुली अधिकाऱ्यांबरोबरच सर्वच कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे स्वयंप्रेरीत वसुली करून थकबाकी कमी राखण्यात यश मिळविले आहे! यात मुख्यतः 'कर्मचाऱ्यांनी व सभासदांनी सक्रिय सहकार्य केल्यानेच हे शक्य झाले हे इथे खास नमूद करण्यास मला आनंद वाटतो.

अहवाल वर्षात कर्जवसुलीच्या विविध तंत्रांमध्ये अमुलाग्र बदल करण्यात आले. कर्जवसुलीच्या क्षेत्रात तज्ञ आणि अनुभवी अशा वसूली अधिकाऱ्यांचे खास वसूली पथक नेमण्यात आले. या पथकातील वसुली अधिकाऱ्यांबरोबरच बँकेच्या सर्वच कर्मचाऱ्यांनी अत्यंत शांततेच्या मार्गाने थकबाकी भरण्याचे आवाहन केले. याचा चांगला परिणाम थकबाकी वसुली मोठ्या प्रमाणावर झाली आहे. काही थकबाकीदारांवर सहकार कायदा कलम १०१(१) अन्वये कारवाई करण्यात आली. तसेच SARFAESI Act 2002 नुसार बँकेने थकबाकीदारांविरुद्ध कारवाई केलेली आहे.

यासाठी जप्ती, ताबा, लिलाव आदी प्रक्रियांचा अवलंब करण्यात आला. मागील वर्षाच्या तुलनेने (कोरोना असताना सुद्धा) बँकेने एन.पी.ए. कमी केला आहे. हि वस्तूस्थिती नमूद करणे गरजेचे आहे. त्यामुळे यावर्षी कर्जाच्या ढोबळ अनुत्पादकतेचे प्रमाण (Gross NPA) ८.३३% इतके राखले गेले तर निव्वळ अनुत्पादकतेचे प्रमाण (Net NPA) **२.८९%** इतके राखले गेले आहे. तसेच पुढील वर्षात सदर प्रमाण यापेक्षा निश्चित कमी होईल असा विश्वास वाटतो.

### ❋ मेडिक्लेम सुविधा :

आपल्या बँकेतर्फे सर्व सेवकांना रु.३ लाखांची मेडिक्लेमची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्याचा फायदा सेवकांना व त्यांच्या कुटूंबियांना झालेला आहे.

### ❋ पालक संचालक समितीच्या बैठका :

बँकेच्या पालक संचालक समितीची संकल्पना यावर्षीही नियोजनपूर्वक राबविण्यात आली. प्रत्येक शाखेच्या अशा पालक संचालक समितीमध्ये ग्राहक सेवा, ग्राहकांच्या सूचना, तक्रारी, शाखेतील स्वच्छता, कर्जप्रकरणे, ठेवसंचयन, थकबाकी वसुली, बँकेची प्रतिमा आदी विषयांवर आढावा घेण्यासाठी सभा आयोजित करण्यात आल्या.

### ❋ मा. संचालक मंडळाचे सहकार्य :

बँकेच्या संचालक मंडळामध्ये अत्यंत तज्ञ व अनुभव संपन्न व्यक्ती असून त्या उद्योग, व्यापार, शेती, समाजकार्य, शिक्षण, पत्रकारिता आदी विविध क्षेत्रात तज्ञ व अनुभव असलेल्या आहेत.

सर्व संचालक मित्र व कर्मचारी बँकेचे **संस्थापक माजी खासदार आदरणीय स्व. किसनरावजी बाणखेले** यांनी घालून दिलेल्या ध्येयधोरणानुसार काम करीत आहोत.

### ❋ कर्मचारी व सेवक वर्ग :

बँकेच्या व्यवसाय वाढीमध्ये एक प्रमुख अंग असलेला घटक म्हणजेच बँकेचा अधिकारी व इतर कर्मचारी वर्ग, बँकेतील कर्मचारी अत्यंत तळमळीने प्रामाणिकपणे काम करतात. संचालक मंडळ व व्यवस्थापनाने सोपविलेल्या जबाबदारीवर वेळेची तमा न बाळगता ते सतत कार्यरत राहतात याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे.

### ❋ प्रशिक्षण :

पुणे जिल्हा नागरी सहकारी बँक्स असोसिएशन लि. पुणे, महाराष्ट्र राज्य सह. संघ मर्या. पुणे व सॅप ॲक्ट संस्था यांनी विविध विषयांवर आयोजन केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमास मा. संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी व कर्मचारी उपस्थित राहीले आहेत. तसेच बँकेच्या सर्व सेवकांना दैनंदिन कामकाजासाठी उपयुक्त असणारे विविध विषयांवर वेगवेगळया संस्थांमार्फत दिले जाणारे प्रशिक्षण नक्कीच फायदेशीर ठरले आहे.

### ❋ केवायसी :

केवायसी नॉर्म्स्‌ची पूर्तता करणेबाबत बँकेच्या सर्व खातेदारांना सुचित करण्यात येते की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशाप्रमाणे जुन्या व नवीन सर्व खातेदारांना केवायसी फॉर्मस्‌ची पूर्तता करणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व खातेदारांनी आपले ज्या शाखेत खाते आहे त्या शाखेतील शाखा व्यवस्थापकांशी संपर्क साधुन आवश्यक त्या कागद पत्रांची पुर्तता करावी.

### ❋ क्रियाशिल सभासद :

९७ वी घटना दुरुस्ती व बँकेने स्विकालेल्या आदर्श पोटनियमानुसार सभासदांची वर्गवारी क्रियाशिल सभासद व निष्क्रिय सभासद अशी करण्यात आलेली आहे. पोटनियम क्र. १४ व १५ नुसार जे सभासद सन २०१५-१६ ते २०२०-२१ या पाच वर्षामधील एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणार आहे. व ज्यांची सभासद रक्कम रु. २,०००/- आहे. आणि ठेवी मध्ये रु. २०,०००/– आहे. किंवा ५०,०००/– चे कर्ज काढलेले आहे. अशा सभासदांना क्रियाशिल सभासद म्हणुन वर्गीकृत करण्यात येईल. अशा सभासदांना संचालक मंडळाचे निवडणुकीस मतदान करण्याचा अधिकार राहणार आहे. याची नोंद घेऊन सभासदांनी हे निकष पूर्ण केले नसतील तर त्यांनी ते पूर्ण करावेत तसेच आपला निवासी पत्ता बदलला असेल तर त्याची माहिति बँकेत त्वरित सादर करावी.

### ❋ नफा वाटणी :

अहवाल वर्षात निव्वळ नफा **रू.२,५१,२३,४८०.९१** इतका झाला असून मागील वर्षाचा शिल्लक नफा **रु. १४,६५४.२३** मिळून वाटणीसाठी उपलब्ध एकूण नफा **रु. २,५१,३८,१३५.१४** इतका आहे. संचालक मंडळाने सदर नफा वाटणीबाबत पुढील शिफारस केलेली आहे.

| | |
|---|---|
| राखीव निधी (२५ टक्के) | रु.६२,८५,000.00 |
| इमारत निधी | रु.१३,00,000.00 |
| गुंतवणुक चढउतार निधी | रु.५२,५0,000.00 |
| लाभांश तरतूद | रु.८१,0५,२६५.00 |
| संशयित बुडीत निधी | रु.३0,00,000.00 |
| बँक सुवर्ण महोत्सव निधी | रु.५,00,000.00 |
| सभासद कल्याण निधी | रु.२,00,000.00 |
| सेवक कल्याण निधी | रु.२,७५,000.00 |
| आकस्मिक निधी | रु. २,२१,000.00 |
| शिल्लक नफा | रु.१,८७०.१४ |
| एकूण | २,५१,३८,१३५.१४ |

रिझर्व्ह बँकेची परवानगी आल्यावर सभासदांना लाभांशाची रक्कम अदा केली जाईल.

### ❋ आभार :

बँकेचे सर्व सन्माननीय सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांनी सततच्या केलेल्या सहकार्याबद्दल आम्ही अत्यंत आभारी आहोत.

याशिवाय प्रामुख्याने रिझर्व्ह बँकेचे मा. मुख्य प्रबंधक सो. मा. विभागीय सहनिबंधक सो. पुण्याचे मा. जिल्हा उपनिबंधक सो. यांचेही बहुमोल मागदर्शन व सहकार्य सातत्याने लाभलेले आहे. त्यामुळे त्यांचे आभार मानतो.

बँकेचे वैधानिक लेखापरिक्षक **मे.आर. आर. पिंगळे ॲण्ड कंपनी** पुणे आणि अंतर्गत लेखापरिक्षक **मे. जगताप ॲण्ड जगताप असो.** यांनी केलेल्या अमूल्य मार्गदर्शनाबदद्ल आम्ही आभारी आहोत.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, पी.डी.सी.सी बँक, आयडीबीआय बँक, एच.डी.एफ.सी.बँक व कार्यक्षेत्रातील सर्व बँका, पतसंस्था, महाराष्ट्र राज्य सह. बँक फेडरेशन, महा.राज्य.सह. बँक असो.

तसेच पुणे जिल्हा नागरी सह. बँक्स असोसिएशन, ग्रामपंचायतीचे सरपंच/उपसरपंच, स्थानिक संस्था, त्यांचे पदाधिकारी/अधिकारी, मुख्य कार्यालय व शाखा हद्दीतील पोलीस अधिकारी, सर्व शाखांचे जागा मालक, कायदेसल्लागार, शाखा सल्लागार, सोने तपासणी सराफ, व्हॅल्युअर, पत्रकार बंधू व पंचक्रोशीतील बँकेचे हितचिंतक इत्यादी सर्वांचे सतत बहुमोल सहकार्य लाभलेले आहे. त्या सर्वांचे आभार व्यक्त करतो.

बँकेच्या कामकाजांतील विविध प्रश्नांची सोडवणूक करताना बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व त्यांचे सर्व सहकारी या सर्वांचे सदोदित सहकार्य लाभल्यामुळेच सदर अहवाल वर्षाचा कार्यकाल यशस्वी होवू शकला.

तसेच बँकेचे संस्थापक **मा. स्व. किसनरावजी बाणखेले** यांच्या प्रेरणेने बँकेच्या प्रगतीमध्ये मोठी वाढ दिसून आली.

**सर्वांनी दिलेल्या बहुमोल सहकार्याबद्दल पुन:श्च मन:पूर्वक आभार !**

आपले स्नेहांकित,

नारायणगाव (पुणे)

दि: १४/०९/२०२१

**ॲड. निवृत्ती मुरलीधर काळे**
अध्यक्ष

## मा. संचालक मंडळ सदस्य व त्यांचे निकटचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती
### (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७५(२)अन्वये)

(आकडे रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशील | कर्ज खाती | येणे कर्ज रक्कम | पेकी थकबाकी | एकूण येणे कर्जाशी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. संचालक मंडळ सदस्य | - | - | नाही | - |
| २. | मा. संचालकांचे निकटचे नातेवाईक | - | - | नाही | - |
| | **एकूण** | **-** | **-** | **नाही** | **-** |

अहवाल वर्षात कोणत्याही संचालक व त्यांचे नातेवाईक यांना कर्ज दिलेले नाही.



### दि. ३१-३-२०२१ अखेरचे ताळेबंद पत्रक

| २०१९-२०२० रुपये पैसे | भांडवल व देणी | | २०२०-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| | **१) भागभांडवल** | | |
| २०,००,००,०००.०० | **अ) अधिकृत भाग भांडवल** | | २०,००,००,०००.०० |
| | २,००,००० लाख भाग प्रत्येकी रु.१००० प्रमाणे | | |
| **१३,९२,६१,४३५.००** | **ब) वसूल भागभांडवल** | | **१४,०१,०७,३८०.००** |
| **२७,२३,६९,४०५.७९** | **२) विधी विहीत गंगाजळी व इतर निधी** | | **३२,७५,६५,९९५.५३** |
| ५,६६,६५,०११.८३ | विधी विहीत गंगाजळी | ६,२०,९७,७०९.५७ | |
| ४,१३,०५,७२७.०० | इमारत निधी | ४,४७,९३,५७२.०० | |
| १,२४,७७२.०० | लाभांश समिकरण निधी | १,२४,००,८१९.०० | |
| ८,२५,०१,९७९.२८ | संशयित बुडीत कर्ज निवारण निधी | १०,७५,०१,९७९.२८ | |
| १,८२,९३,२५०.०० | गुंतवणूक घसारा निधी | ३,१४,८६,०५०.५८ | |
| १,६६,९२,८००.५८ | रोखे चढ-उतार निधी | १,००,००,०००.०० | |
| ४,३३,०००.०० | धर्मदाय निधी | ४,३३,०००.०० | |
| ११,००,३३२.१० | सेवक कल्याण निधी | ११,००,३३२.१० | |
| ७५,००,०००.०० | उत्तम कर्जावरील संभाव्य तरतुद | १,००,००,०००.०० | |
| ३,९३,५३,६५५.०० | पुनर्मुल्यांकन राखीव निधी | ३,९३,५३,६५५.०० | |
| १४,७२,०००.०० | ग्रामीण शाखा विकास निधी | १४,७२,०००.०० | |
| ७३,६६८.०० | बँक विकास निधी | ७३,६६८.०० | |
| ६,७५,०००.०० | इरोजन इन व्हॅल्यु ऑफ असेट | ६,७५,०००.०० | |
| १,१५,०००.०० | आकस्मिक निधी | १,१५,०००.०० | |
| ३५,३६,०००.०० | संगणक विकास निधी | ३५,३६,०००.०० | |
| ५,५०,०००.०० | निवडणूक निधी | ५,५०,०००.०० | |
| १४,३०,०००.०० | शैक्षणिक निधी | १४,३०,०००.०० | |
| ४,४७,२१०.०० | सभासद कल्याण निधी | ४,४७,२१०.०० | |
| १,००,०००.०० | सुवर्ण महोत्सव निधी | १,००,०००.०० | |
| --- | **३) भाग भांडवल शासनाची प्रमुख अथवा सहाय्यकारी भागीदारी निधी** | | |
| **३१०,७८,७७,२७७.६५** | **४) ठेवी व अन्य खाते** | | **३,४४,१३,६४,३६७.०२** |
| | अ) मुदत ठेव | | |
| १,८०,६०,३३,१९९.१४ | १) व्यक्तिश: | १,९४,१७,७०,३३८.२९ | |
| ०.०० | २) मध्यवर्ती सहकारी बँक व | | |
| ७३,५८,६९,३५५.०० | ३) इतर सहकारी संस्था | ८१,६३,५७,४६०.०० | |
| | ब) बचत ठेव | | |
| ४२,०७,३१,४२१.२९ | १) व्यक्तिश: | ४६,३८,२१,४९७.७९ | |

## दि. ३१-३-२०२१ अखेरचे ताळेबंद पत्रक

| २०१९-२०२० रुपये पैसे | जिंदगी व येणी | | २०२०-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| **४,०६,१५,८५१.००** | **१) रोख शिल्लक** | | **५,२०,२५,५९८.००** |
| **२२,७५,७१,०६९.३३** | **२) बँकातील शिल्लक** | | **१७,८६,३१,२७०.३१** |
| २७,३४,६५४.०३ | अ. एम. एस. सी. बँक मुंबई | ११,४७,०४१.६१ | |
| १,४३,८२,७०६.४६ | ब. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | १,५३,७०,९३४.२१ | |
| ७,१४,००,९९७.३९ | क. राष्ट्रीयकृत बँक | ५,५४,६५,७५२.६८ | |
| १३,९०,५२,७११.४५ | ड. व्यापारी बँक | १०,६६,४७,५४१.८१ | |
| --- | **३) मागणी करताच मिळणाऱ्या वा/ अल्प नोटिसीने मिळणाऱ्या ठेवी** | | --- |
| **१,४०,६३,१६,१९२.००** | **४) गुंतवणूक** | | **१,७१,७६,८२,९४७.००** |
| १,१३,५८,२३,१२२.०० | अ. सरकारी कर्ज रोखे | १,३६,४७,२४,८७७.०० | |
| ७,३१,५०,०००.०० | ब. राज्य सहकारी बँक | ७,३१,१५,०००.०० | |
| १२,४९,००,०००.०० | क. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक | १३,२४,००,०००.०० | |
| १२,४९,००,०००.०० | इ. इतर सहकारी बँक | | |
| १,०१,०००.०० | फ. सहकारी संस्थांचे भागातील गुंतवणूक | १,०१,०००.०० | |
| ७,२३,४२,०७०.०० | ग. सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक | १४,७३,४२,०७०.०० | |
| --- | **५) शासनाच्या प्रमुख अथवा सहाय्यकारी निधीतून गुंतवणूक** | | --- |
| **१७५,७८,५७,४२०.२६** | **६) कर्जे** | | **१,९२,१५,८०,०४२.६३** |
| --- | अ) अल्पमुदत कर्जे | --- | |
| | (कॅश क्रेडीट,ओव्हरडॉफ्ट व बिल डिस्काउंटींग यापैकी) | | |
| --- | सरकारी कर्जरोखे व तत्सम तारणावर | --- | |
| ४०,१९,५६,७१६.४१ | अन्य तारणावर | ५२,००,९६,७२८.२२ | |
| --- | विनातारणी जामीनकी | --- | |
| | ब) मध्यम मुदतीची कर्जे | | |
| --- | सरकारी कर्जरोखे व तत्सम तारणावर | --- | |
| ३१,५९,२५,३३६.६२ | अन्य तारणावर | १८,३२,१०,३५१.७० | |
| | क) दीर्घ मुदतीची कर्जे | | |
| --- | सरकारी कर्जरोखे व तत्सम तारणावर | --- | |

## दि. ३१-३-२०२१ अखेरचे ताळेबंद पत्रक

| २०१९-२०२० रुपये पैसे | भांडवल व देणी | | २०२०-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| --- | २) मध्यवर्ती सहकारी बँक | --- | |
| ५१,२७,३५८.१५ | ३) इतर सहकारी संस्था | १,००,९४,५४५.१५ | |
| | क) चालू ठेव | | |
| ११,३३,७२,३०८.४० | १) व्यक्तिश: | १३,४४,०६,४४२.६६ | |
| --- | २) मध्यवर्ती सहकारी बँक | --- | |
| २,४७,५७,४७०.६७ | ३) इतर सहकारी संस्था | ७,३०,३७,५६६.१३ | |
| १९,८६,१६५.०० | इ) मुदत संपलेल्या ठेवी | १८,७६,५१७.०० | |
| --- | **५) बाहेरील कर्जे** | | ०.०० |
| ००.०० | **६) शाखांतर्गत खाती जुळणी** | | ०.०० |
| **७,२२,९४६.००** | **७) देणे व्याज** | | ७,४०,११९.०० |
| **३,६१,८८,६०९.०८** | **८) इतर देणी** | | ४,८१,०८,४३९.७६ |
| १७,६२६.०० | अ) पे-ऑर्डर पेयेबल | ४८,४९९.०० | |
| १४,६८,२१५.०० | ब) लाभांश देणे | ३,७२,८७६.०० | |
| २,२२,०२,७६८.०८ | क) अन्य देणी | ३,०१,८७,०६४.७६ | |
| १,२५,००,०००.०० | ड) आयकर तरतुद | १,७५,००,०००.०० | |
| **२,३१,७०,५८५.९७** | **९) नफा-तोटा खाते** | | २,५१,३८,१३५.१४ |
| १,७६,०३,३३८.०५ | मागील वर्षाचा नफा | १,६४,३५,५३८.९७ | |
| १,०८,५०,८३४.५१ | वजा नफा विभागणी | १,६४,२०,८८४.७४ | |
| ६७,५२,५०३.५४ | शिल्लक नफा | १४,६५४.२३ | |
| १,६४,१८,०८२.४३ | अधिक चालू वर्षाचा नफा | २,५१,२३,४८०.९१ | |
| **११,१७,७३,३७२.३४** | **११) अनुत्पादित कर्जावरील व्याज तरतुद** | | १२,३४,६०,६७६.४० |
| ७७,१२,१०५.९५ | **१२) डीइएफ फंड** | | ९१,७६,१३२.५१ |
| | जी.एस.टी.देणे | | ४३,०२३.१० |
| | संभाव्य देणी | | |
| १२,६२,९५७.०० | बँक हमी देणे - मागील वर्षी | १३,१४,९५७.०० | |
| १३,१४,९५७.०० | चालू वर्षी | १५,९९,४५७.०० | |
| ३,६९,९०,७५,,७३७.७८ | एकूण | | ४,११,५७,०४,२६८.४६ |

-: संचालक मंडळ :-

मा. श्रीमती मथुराबाई किसनराव बाणखेले
स्व. प्रल्हाद नानाभाऊ बाणखेले
मा. सौ. विमलताई वसंतराव थोरात
मा. नारायण धोंडीबा गाढवे
तज्ञ संचालक : मा. डॉ. जैन्नुद्दीन रमजान मुल्ला

मा. स्व. महादेव उर्फ तात्यासाहेब गुंजाळ
मा. जगदीश दशरथ फुलसुंदर
मा. सुनिताताई बबनराव साकोरे
मा. डॉ. सचिन भागुजी कांबळे

मा. मनसुखशेठ पुखराज भंडारी
मा. अशोक बन्सीलाल गांधी
मा. सचिन सुभाष कांकरिया



## दि. ३१-३-२०२१ अखेरचे ताळेबंद पत्रक

| २०१९-२०२० रुपये पैसे | जिंदगी व येणी | | २०२०-२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १,०३,९९,७५,३६७.२३ | अन्य तारणावर | १,२१,८२,७२,९६२.७१ | |
| --- | विनातारणी जामीनकी | --- | |
| २,२२,०२,३८६.०० | ७) येणे व्याज गुंतवणुकीवरील | | १,७६,०२,८४८.०० |
| १,२०,३५०.०० | ८) शाखांतर्गत खाती जुळणी | | ६०,०००.०० |
| ५,०३,१७,१६८.४६ | ९) इमारत | | ४,९२,२०,८१७.४६ |
| १,४४,८५,९९३.७० | १०) फर्निचर व फिक्श्चर | | १,४१,४३,०२८.१७ |
| १४,८८,६३८.४२ | ११) वाहन | | १२,६५,३४२.४२ |
| ७,०५०.९७ | १२) लायब्ररी | | ६,३४५.९७ |
| ३९,९८,६१७.४० | १३) संगणक मशिनरी/ डेडस्टॉक | | ३०,०२,९६५.३० |
| १७,४७,७५१.४७ | १४) संगणक प्रणाली | | २३,२५,६४४.२२ |
| ४,३२,३१६.०० | १५) यंत्र सामुग्री व उद्योग | | ३,८८,१३८.०९ |
| ५१,१५,९८१.०० | १६) नॉन बँकींग ॲसेट | | ५१,१५,९८१.०० |
| १,६२,७५,२४६.८९ | १७) इतर येणी | | १,९९,२३,०५१.१८ |
| ११,१७,७३,३७२.३४ | १८) अनुउत्पादित कर्जावरील येणे व्याज | | १२,३४,६०,६७६.४० |
| ३,०९,५१,९३६.३९ | १९) उत्पादित कर्जावरील व्याज | | -- |
| ७७,९८,३९६.१५ | २०) डीइएफ | | ९२,६९,५७२.३१ |
| | २१) संभाव्य येणी | | |
| १२,६२,९५७.०० | बँक हमी येणे- मागील वर्षी | १३,१४,९५७.०० | |
| १३,१४,९५७.०० | चालू वर्षी | १५,९९,४५७.०० | |
| ३,६९,९०,७५,७३७.७८ | एकूण | | ४,११,५७,०४,२६८.४६ |

सोबत दिलेल्या शेऱ्यास अनुसरुन

**मे. आर. आर. पिंगळे ॲण्ड कंपनी**
वैधानिक लेखापरिक्षक

**मे. जगताप ॲण्ड जगताप असो.**
अंतर्गत लेखापरिक्षक

**मा. श्री. अशोक सावळकर**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**मा. श्री. नितीन लोणारी**
उपाध्यक्ष

**मा. श्री. निवृत्ती मुरलीधर काळे**
अध्यक्ष



### दि.१-४-२०२० ते दि. ३१-३-२०२१ वर्षा अखेरचे नफा-तोटा पत्रक

| ३१/३/२०२० रुपये पैसे | खर्च | ३१/३/२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|
| २२,१४,८३,०४२.०० | ठेवींवरील व्याज | २२,८७,३६,१५४.९६ |
| ५,२९,७६,२९०.९६ | सेवक पगार, भत्ते, प्रा.फंड इ. | ५,५९,६८,९२१.०० |
| २,१७,९२४.०० | संचालक मंडळ सभा भत्ते खर्च | १,९२,७७३.०० |
| ६८,३४,८१५.०२ | दिवा बत्ती, भाडे, विमा, कर | ७०,०८,०९२.९६ |
| २२,५००.०० | वकील व कोर्ट शुल्क | ४८,५४६.२२ |
| २१,१२,८४५.२४ | टपाल, तार, फोन | १५,२८,११०.३६ |
| १७,१२,४२०.२६ | ऑडीट फी | १२,२८,४९६.२६ |
| ५०,८१,३०८.४३ | घसारा | ४८,९४,९९९.३३ |
| ४,०३,२८८.७१ | छपाई, स्टेशनरी, जाहिरात | ४,२६,९०५.३५ |
| १६,६१,६१५.०० | दैनंदिन ठेव एजंट कमिशन | ११,४८,८७६.०० |
| ३३,९०,१०६.७० | डी.आय.सी.जी.सी विमा हप्ता | ४१,८५,८६१.७८ |
| ८२,२७०.५८ | बँक्स् फेडरेशन असो. वार्षिक वर्गणी | १,०५,९३०.५८ |
| २,३३,३७०.५० | वार्षिक मिटींग खर्च | ५७,५८४.०० |
| ०.०० | सिक्युरीटी गार्ड पगार | १६,०३,६०७.०० |
| ४०,११,५४८.८३ | इतर खर्च | ४०,२८,२८४.११ |
| | **तरतूदी** | |
| ०.०० | सरकारी रोख्यावरील मुल्यांकन | १५,००,०००.०० |
| ३,००,००,०००.०० | संशयित बुडीत कर्ज व इतर निधी | २,००,००,०००.०० |
| १,८१,७१,००१.१० | आयकर तरतूद | २,७८,७०,१७१.३० |
| ३७,५८,२६५.०० | स्टाफ ग्रॅच्यूईटी | ०.०० |
| | संभाव्य देणी | १,५०,००,०००.०० |
| १,६४,१८,०८२.४३ | **चालू नफा** | **२,५१,२३,४८०.९१** |
| **३६,८५,७०,६९४.७६** | **एकूण** | **४०,०६,५६,७९५.१२** |


**-: संचालक मंडळ :-**

**मा. श्रीमती मथुराबाई किसनराव बाणखेले**
**स्व. प्रल्हाद नानाभाऊ बाणखेले**
**मा. सौ. विमलताई वसंतराव थोरात**
**मा. नारायण धोंडीबा गाढवे**
**मा. स्व. महादेव उर्फ तात्यासाहेब गुंजाळ**
**मा. जगदीश दशरथ फुलसुंदर**
**मा. सुनिताताई बबनराव साकोरे**
**मा. डॉ. सचिन भागुजी कांबळे**
**मा. मनसुखशेठ पुखराज भंडारी**
**मा. अशोक बन्सीलाल गांधी**
**मा. सचिन सुभाष कांकरिया**

**तज्ञ संचालक : मा. डॉ. जैनुद्दीन रमजान मुल्ला**

## दि.१-४-२०२० ते दि. ३१-३-२०२१ वर्षा अखेरचे नफा-तोटा पत्रक

| ३१/३/२०२० रुपये पैसे | उत्पन्न | ३१/३/२०२१ रुपये पैसे |
|---|---|---|
| २४,३२,०५,९५६.५३ | सभासद कर्जावरील व्याज | २४,३७,३१,१६०.२८ |
| ९,५७,४४,४८६.०४ | गुंतवणूकीवरील व्याज | १०,१४,१८,५२७.१९ |
| ५,३३,६५१.८१ | कमिशन | १,८२,८०४.२२ |
| १,७७,२२,३१८.०० | सरकारी रोखे विक्री नफा | ४,४९,७०,७६८.०० |
| १५,००१.०० | भागावरील लाभांश | 0.00 |
| २,६६,०२३.३० | लॉकर भाडे | ३,५६,३९९.२० |
| १,१०,८३,२५८.०८ | इतर जमा | ९९,९७,१३६.२३ |
| **३६,८५,७०,६९४.७६** | **एकूण** | **४०,०६,५६,७९५.१२** |

सोबत दिलेल्या शेऱ्यास अनुसरुन

**मे. आर. आर. पिंगळे अँण्ड कंपनी**
वैधानिक लेखापरिक्षक

**मे. जगताप अँण्ड जगताप असो.**
अंतर्गत लेखापरिक्षक

**मा. श्री. अशोक सावळकर**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**मा. श्री. नितीन लोणारी**
उपाध्यक्ष

**मा. श्री. निवृत्ती मुरलीधर काळे**
अध्यक्ष

## सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रकापेक्षा जादा/कमी झालेल्या खर्चाची माहिती व सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक

| खर्च | सन २०२०-२०२१ चे अंदाज पत्रक रुपये पैसे | सन २०२०-२०२१ चे प्रत्यक्ष खर्च रुपये पैसे | सन २०२१-२०२२ चे अंदाज पत्रक रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ठेवींवरील व्याज | २६,००,००,०००.०० | २२,८७,३६,१५४.९६ | २४,५०,००,०००.०० |
| सेवक पगार, भत्ते, प्रा. फंड इ. | ७,००,००,०००.०० | ५,५९,६८,९२१.०० | ६,५०,००,०००.०० |
| सिक्युरीटी गार्ड पगार | 0.00 | १६,०३,६०७.०० | १७,५०,०००.०० |
| संचालक मंडळ सभा भत्ते/सभा खर्च | २,२५,०००.०० | १,९२,७७३.०० | २,२५,०००.०० |
| दिवा बत्ती/भाडे/विमा/कर | १,००,००,०००.०० | ७०,०८,०९२.९६ | ७३,००,०००.०० |
| कोर्ट खर्च | १,५०,०००.०० | ४८,५४६.२२ | ५५,०००.०० |
| टपाल/फोन | २५,००,०००.०० | १५,२८,११०.३६ | १५,५०,०००.०० |
| ऑडीट फी | १७,००,०००.०० | १२,२८,४९६.२६ | १५,००,०००.०० |
| घसारा | ६०,००,०००.०० | ४८,९४,९९९.३३ | ५०,००,०००.०० |
| छपाई/स्टेशनरी/जाहिरात | १०,००,०००.०० | ४,२६,९०५.३५ | ५,००,०००.०० |
| किरकोळ व्यवस्थापकीय खर्च | ५०,००,०००.०० | ४१,३४,२१४.६९ | ४६,००,०००.०० |
| डी.आय,सी.जी.सी विभाग | ३५,००,०००.०० | ४१,८५,८६१.७८ | ४५,००,०००.०० |
| वार्षिक सभा खर्च | २,५०,०००.०० | ५७,५८४.०० | १,३०,०००.०० |
| पिग्मी एजंट कमिशन | १६,००,०००.०० | ११,४८,८७६.०० | १२,००,०००.०० |
| सरकारी रोख्यांवरील मूल्यांकन | ५०,००,०००.०० | १५,००,०००.०० | २५,००,०००.०० |
| बुडीत संशयीत/उत्तम कर्ज तरतुद | १,६६,१५,०००.०० | १,७५,००,०००.०० | २५,००,०००.०० |
| स्टॅंडर ॲसेंटर तरतुद | 0.00 | २५,००,०००.०० | १०,००,०००.०० |
| स्टाफ ग्रॅज्युईटी | २५,००,०००.०० | 0.00 | २०,००,०००.०० |
| आयकर | २,००,००,०००.०० | २,७८,७०,१७१.३० | २,००,००,०००.०० |
| संभाव्य देणी | 0.00 | १,५०,००,०००.०० | ७५,००,०००.०० |
| अपेक्षित नफा | ३,२५,००,०००.०० | २,५१,२३,४८०.९१ | २,७८,००,०००.०० |
| **एकूण** | **४३,८५,४०,०००.००** | **४०,०६,५६,७९५.१२** | **४०,१६,१०,०००.००** |

## सन २०२०-२०२१ चे अंदाजपत्रकापेक्षा जादा/कमी झालेल्या उत्पन्नाची माहिती व सन २०२१-२२ चे अंदाजपत्रक

| उत्पन्न | सन २०२०-२०२१ चे अंदाजित उत्पन्न रुपये पैसे | सन २०२०-२०२१ चे प्रत्यक्ष उत्पन्न रुपये पैसे | सन २०२१-२०२२ चे अंदाज पत्रक रुपये पैसे |
|---|---|---|---|
| सभासद कर्जावरील व्याज | २६,५०,००,०००.०० | २४,३७,३१,१६०.२८ | २८,००,००,०००.०० |
| गुंतवणूकीवरील व्याज | १०,००,००,०००.०० | १०,१४,१८,५२७.१९ | ११,००,००,०००.०० |
| कमिशन | ७,००,०००.०० | १,८२,८०४.२२ | २,००,०००.०० |
| भागावरील लाभांश | १५,०००.०० | ०.०० | १०,०००.०० |
| लॉकर भाडे | ३,२५,०००.०० | ३,५६,३९९.२० | ४,००,०००.०० |
| सरकारी रोखे विक्री नफा | ६,००,००,०००.०० | ४,४९,७०,७६८.०० | १०,००,०००.०० |
| इतर उत्पन्न | १,२५,००,०००.०० | ९९,९७,१३६.२३ | १,००,००,०००.०० |
| **एकूण** | **४३,८५,४०,०००.००** | **४०,०६,५६,७९५.१२** | **४०,१६,१०,०००.००** |



## Disclosures as per RBI Norms

(Rs. in Lakh)

| | Particulars | 31.03.2020 | 31.03.2021 |
|---|---|---|---|
| 1 | **Capital to Risk Assets Ratio (CRAR)** | 18.90 % | 19.94% |
| 2 | **Movement of CRAR i.e. CRAR as on Balance Sheet date for the Current year vis-a-vis Previous Year** | | |
| 3 | **Investments:** | | |
| | a) Book Value and Face Value of Investment | 11358.23 | 13647.25 |
| | b) market Value of Investment | 11297.21 | 13409.39 |
| | Non Performing Non SLR Investment | 48.80 | 48.80 |
| | Opening Balance | | |
| | Additions during the year since 1st April | --- | --- |
| | Reduction during the above period | --- | – |
| | Closing Balance | 48.80 | 48.80 |
| | Total Provision held | 0.00 | 0.00 |
| 4 | **Advance against real estate, construction business, housing** | **2196.40** | **1746.85** |
| 5 | **Advances against share & Debentures** | Nil | Nil |
| 6 | **Advances to Directors, their relatives, Companies / Firm in which they are Interested** | | |
| | a) Fund-based | Nil | Nil |
| | b) Non-Fund based (Guarantees, L/C, etc.) | | |
| 7 | **Cost of Deposit** | | |
| | Average Cost of Deposits | 7.20% | 7.07% |
| 8. | **NPAs** | | |
| | a) Gross NPAs | 2590.81 | 1599.77 |
| | b) Net NPAs | 1765.79 | 524.75 |
| 9 | **Movement in NPAs i.e. Gross and NPAs as on Balance sheet date for the Current year Vis-A-Vis previous year. Net NPAs should be arrived at after deducting provisions held, interest suspense account etc.** | Nil | Nil |
| 10 | **Profitability** | | |
| | a) Interest Income as a Percentage of Working Funds | 9.53% | 8.86% |
| | b) Non-Interest income as a percentage of working Funds | 0.83% | 1.43% |
| | c) Operating Profit as a percentage of working Funds | 1.30% | 1.89% |
| | d) Return on Assets | 0.46% | 0.64% |
| | e) Business (Deposits+Advances) Per employee | 491.49 | 558.63 |
| | f) Profit per employee | 1.66 | 2.61 |
| 11 | **Provision made towards NPAs , Depreciation in INVESTMENT** | 1007.95 | 1389.96 |
| 12 | **Movement in Provisions:** | | |
| | a) Towards NPAs | 825.02 | 1075.02 |
| | b) Towards Depreciation in INVESTMENTS | 182.93 | 314.86 |
| | c) Towards Standard Assets | 75.00 | 100.00 |
| 13 | **Foreign CURRENCY Assets & Liabilities (if applicable)** | --- | --- |
| 14 | **Payment of DICGC Insurance Premium** | **33.90** | **41.86** |
| 15 | **Penalty imposed by RBI** | Nil | Nil |
| 16 | **Restriction Accounts** | Nil | Nil |



## दि. ३१/०३/२०२१ अखेर शाखावार आर्थिक स्थिती

(आकडे रु. लाखात)

| अ. क्र. | शाखा | ठेवी | | कर्जे | | नफा | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३१/३/२०२० | ३१/३/२०२१ | ३१/३/२०२० | ३१/३/२०२१ | ३१/३/२०२० | ३१/३/२०२१ |
| १. | मुख्य कार्यालय स्थापना : २/४/२००० फोनः०२१३२-२४२१४८,२४५१५७ | --- | --- | --- | --- | -४९१.५० | -४७७.६८ |
| २. | मुख्य शाखा : नारायणगाव स्थापना : १७/१/१९८० फोन : ०२१३२-२४२४७८ | ४३१४.६५ | ५२२५.२६ | ६६३.८९ | ९०२.६२ | १७.७९ | ५.३६ |
| ३. | आळेफाटा स्थापना:११/१२/१९९६ फोन : ०२१३२-२६२५४८ २६३५४८ | ५८५३.१७ | ६५९७.३३ | १७५३.५१ | २२४१.६५ | ६९.७२ | ५४.७२ |
| ४. | मंचर स्थापना : २३/५/१९९७ फोनः०२१३३-२२३८४८/२२५९४८ | ३८०५.८५ | ३७१९.५३ | १८६८.१८ | १८६०.२१ | ६.९३ | १०३.१२ |
| ५. | पुणे-नाशिक हायवे नारायणगाव स्थापना : ८/८/१९९९ फोन : ०२१३२-२४२५४८ | ३०७३.३४ | ३९७६.४९ | १९७८.३८ | २२४४.४१ | ६९.७० | ३९.३४ |
| ६. | भोसरी स्थापना : ३०/१/२००१ फोन : ०२०- २७१२८५४८ | २८४३.२१ | ३३५२.६० | २०५३.८८ | २०६६.४१ | १३०.९३ | १३८.१४ |
| ७. | राजगुरुनगर स्थापना १८/९/२००२ फोनः०२१३५-२२६५४८/२२६६४८ | ५२८५.५२ | ५५४३.७७ | १८९६.४२ | २०९३.९० | ९५.४८ | ९२.४० |
| ८. | शिवाजीनगर स्थापना:२३/८/२००३ फोनः०२०-२४५७०५४८/२४५७१५४८ | ७३०.८८ | ७५४.१९ | ७९८.८६ | ७८२.२२ | १५.३६ | ७.५४ |
| ९. | चाकण स्थापना : १८/४/२००९ फोन : ०२१३५-२४९५४८ | १९९२.२६ | २२४०.७२ | २०५५.३९ | २१७०.४७ | ११८.८० | १०९.४१ |
| १०. | शिरुर स्थापना : ४/९/२०१० फोन :०२१३८-२२४८४८ | ९०२.३१ | ९६१.८९ | ११३०.८७ | १२१८.१८ | २३.८५ | ३४.३६ |
| ११. | आळंदी स्थापना : २४/६/२०१४ फोन : ०२१३५-२३२५४८ | ३५५.१८ | ४१०.२५ | ९४०.८१ | १०८२.१९ | ४२.७६ | ४६.५३ |
| १२. | घोडेगाव स्थापना : २४/६/२०१४ फोन :०२१३३-२४४१४८ | १०३५.४५ | ८७४.६७ | ७४६.३९ | ८७२.१३ | १६.१६ | १८.१९ |
| १३. | शिक्रापुर स्थापना : २६/८/२०१४ फोन :०२१३७-२८६१४८ | ४५९.७० | ३६८.७८ | ८२३.५९ | ७५२.४४ | २१.३८ | ३८.२१ |
| १४. | काळेवाडी स्थापना:२६/८/२०१४ मोबा :९४२२२७५९९८ | ४२७.२५ | ३८८.१८ | ८६८.४० | ९२८.९७ | २६.८१ | ४१.६० |



**M/S R R PINGALE & CO**
**CHARTERED ACCOUNTANTS**
1089 Munisurvat Avenue, Shukrwar Peth, Shivaji Road, Swarget Corner Pune -411002

---

FORM No. N-1.
[*See* section 81 and rule 69 (*3*)]

## INDEPENDENT AUDITOR'S REPORT

To,
**Hon. Members of**
**Lala Urban Co-operative Bank Limited ,Narayangaon**
**FulsunderMarket ,Pune Nashik High way. Narayangaon**
**Taluka-Junner Dist.- Pune Pin.410504**

***Ref.* :- Appointment Letter Reference No. Dated**

### Report on the Financial Statements as a Statutory Auditor

1. We have audited the accompanying financial statements of the **Lala Urban Co-operative Bank Limited ,Narayangaon**which comprise the Balance Sheet as at 31st March 2021 and theStatement of Profit and Loss for the year ended, and a summary of significant accounting policiesand other explanatory information incorporated in these financial statements of the Bank alongwith its Branches and Extension counters audited by us for the period 1st April 2020 to 31st March2021.

**Management's Responsibility for the Financial Statements**

2. Management is responsible for the preparation of these financial statements in accordancewith Maharashtra Co-operative societies Act, 1960, Banking Regulation Act, 1949 (A.A.C.S.) andRBI Guidelines. This responsibility includes the design, implementation andmaintenance of internal control relevant to the preparation of the financial statements that arefree from material misstatement, whether due to fraud or error.

**Auditor's Responsibility**

3. Our responsibility is to express an opinion on these financial statements based on our audit.We conducted our audit in accordance with the applicable Standards by The Institute of CharteredAccountants of India and under the MCS Act / BR Act / RBI guidelines. Those Standards requirethat we comply with ethical requirements and plan and perform the audit to obtain reasonableassurance about whether the financial statements are free from material misstatement, whether dueto fraud or error.

4. An audit involves performing procedures to obtain audit evidence about the amounts anddisclosures in the financial statements. The procedures selected depend on the auditor's judgment,including the assessment of the risks of material misstatement of the financial statements,whether due to fraud or error. In making those risk assessments, the auditor considers internalcontrol relevant to the Bank's preparation and fair presentation of the financial statements inorder to design audit procedures that are appropriate in the circumstances. An audit also includesevaluating the appropriateness of accounting policies used and the reasonableness of theaccounting estimates made by management, as well as evaluating the overall presentation of thefinancial statements.

5. We believe that the audit evidence we have obtained is sufficient and appropriate to providea basis for our audit opinion.

**Opinion**

6. In our opinion and to the best of our information and according to the explanations given tous, the said accounts together with the notes thereon give the information required by the BankingRegulation Act, 1949 (A.A.C.S.) as well as the Maharashtra Co-operative Societies Act, 1960, theMaharashtra Co-operative Societies Rules 1961, and any other applicable Acts, and or circularsissued by the Registrar, in the manner so required for the bank and give a true and fair view inconformity with the accounting principles generally accepted in India:

*(i)*in the case of the Balance Sheet, of the state of affairs of the Bank as at 31st March,2021;

(*ii*) in the case of the Statement of profit and loss of the profit/loss for the year ended on that date as per our attached report; and

**Report on Other Legal and Regulatory Matters**

7. The Balance Sheet and the Profit and Loss Account have been drawn up in accordance withthe provisions of Section 29 of the Banking Regulation Act, 1949 read with provisions of theMaharashtra Co-operative Societies Act, 1960 & Maharashtra Co-operative Societies Rules 1961.

8. **We report that:**

(*a*) We have obtained all the information and explanations which, to the best of ourknowledge and belief, were necessary for the purpose of our audit and have found them to be satisfactory.

(*b*) The transactions of the Bank, which have come to our notice, have been within thepowers of the Bank.

(*c*) The returns received from the offices and branches of the Bank have been foundadequate for the purposes of our audit.

9. In our opinion, the Balance Sheet and Profit and Loss Account comply with applicable Accounting Standards as reported in our report.

10. **We further report that:**

(*i*) The Balance Sheet and Profit and Loss Account dealt with by this report are inagreement with the books of account and the returns. Profit & Loss account show the profit of Rs- 251.23 lakhs but in our opinion it should be as per audit report attached with this report.

(*ii*) In our opinion, proper books of account as required by law have been kept by theBank so far as appears from our examination of those books.

(*iii*) The reports on the accounts of the branches audited by us / branch auditors havebeen dealt with in preparing our report in the manner considered necessary by us.

(*iv*) for the year under audit, the bank has been awarded **"A"** classification.

For M/s. R.R. Pingale and Co.
Chartered Accountants

CA R.R. Pingale
Proprietor
FRN 117610W | M. No. 103811
Place : Pune
Date : 31-8-2021

R. R. Pingale & Co. Chartered Accountants PUNE



Calulation of C.R.A.R Ratio As on 31 March 2021 (Amount Rs.Lakh)

| No | Particulars | As on Date | 31 March 2021 |
|---|---|---|---|
| I | Capital Funds | | |
| A | Tier I Capital Elements | | 2937.94 |
| | i) Paid-Up Capital | 1401.07 | |
| | II) Reserve Fund | 620.98 | |
| | Iii) Other Reserve Fund | 664.51 | |
| | V) Surplus in P/L A/C | 251.38 | |
| | Total of Tier I | | |
| B | Tier II Capital Elements | | |
| | i) General Provision | 100.00 | |
| | Other Funds | | |
| | i) Investment Fluctuation Fund | 100.00 | |
| | II) Revaluation Reserve | 177.09 | |
| | Total of Tier II | | 377.09 |
| | 1.25% of Risk Assets | | |
| | Total Capital Fund - A+B (Tire I + Tire II) | | 3315.03 |
| II | Part B Risk Assets | | |
| | Total of Risk Weighted Assets As per Part B | | 16625.97 |
| III | Percentage of Capital Funds to Risk Weighted Assets I/II ² 100 | | 19.94% |

Position of Net Advances/Net NPAs As on 31 March 2021 (Amount Rs.Lakh)

| Sr | Particulars | 31.03.2020 | 31.03.2021 |
|---|---|---|---|
| 1 | Gross Advances | 17578.57 | 19215.80 |
| 2 | Gross NPA | 2590.81 | 1599.77 |
| 3 | Gross NPAs as Percentage to Gross Advances | 14.74% | 8.33% |
| 4 | Deducation | | |
| | A) Balance in interest suspense account/OIR | 0 | 0 |
| | B) DICGC/ECGC claims received and held pending adjustment | 0 | 0 |
| | C) Part Payment NPA Account received and kept in suspenes account | 0 | 0 |
| | Total Deducation | 0 | 0 |
| 5 | Total NPA Provision hed ( BDDR Special) | 825.02 | 1075.02 |
| | BDDR, Balance after appropriation) | | |
| 6 | Net Adavances { 1(*) 4 (-) 5} | 16753.55 | 18140.78 |
| 7 | Net NPAs {2(-) 4(-)5} | 1765.79 | 524.75 |
| 8 | Net NPAs as per percentage of net advance | 10.54% | 2.89% |



### सन २०१६ ते २०२१ अखेरील बँकेच्या प्रगतीचा आढावा

(रुपये लाखात)

| अ.नं. | तपशील | मार्च २०१६ | मार्च २०१७ | मार्च २०१८ | मार्च २०१९ | मार्च २०२० | मार्च २०२१ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भागभांडवल | १,११९.५५ | १,२०८.८० | १,३५५.१५ | १,४०७.२३ | १३९२.६१ | १४०१.०७ |
| २. | सभासद संख्या | ११७२८ | १२१४८ | १२६१२ | १२,८२५ | १२८७६ | १३२६५ |
| ३. | राखीव व इतर निधी | १,३६९.३८ | १,६२७.५८ | १,७८१.०० | २,०७५.५० | २७२३.६९ | ३,२७५.६६ |
| ४. | ठेवी | २६,७५३.८४ | २८,८६४.४४ | ३१,४८०.९४ | ३१,१९३.९७ | ३१०७८.७७ | ३४,४१३.६४ |
| ५. | कर्जे | १८,११०.८० | १६,८४४.७४ | १८,८६३.५० | १९५०६.९६ | १७५७८.५७ | १९,२१५.८० |
| ६. | गुंतवणूक | ८,७३५.३८ | १२,१२०.८९ | १२,८७३.५९ | १२,४६१.५९ | १४०६३.१६ | १७,१७६.८३ |
| ७. | खेळते भांडवल | ३०,२४२.७६ | ३२,६७४.७७ | ३३,५१४.४५ | ३६,०६६.५८ | ३५५६३.५० | ३८,९३२.७३ |
| ८. | नफा | २११.७२ | १२३.५५ | १७८.०६ | १७६.०३ | २३१.७१ | २५१.२३ |
| ९. | नेट एन.पी.ए. | २.००% | ६.६२% | ५.००% | ७.३९% | १०.५४% | २.८९% |
| १०. | ऑडीट वर्ग | 'अ' | 'अ' | 'अ' | 'ब' | 'ब' | 'अ' |

## पोटनियम दुरुस्ती

| पोटनियम क्रमांक | प्रचलित पोटनियम | सुधारीत पोटनियम | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| ३ | **कार्यक्षेत्र –** बँकेचे कार्यक्षेत्र पुणे हा जिल्हा व त्याच्या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित राहील यामध्ये कोणताही बदल करावयाचा असल्यास रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व नोंदणी अधिकारी यांची लेखी पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. | **कार्यक्षेत्र–** बँकेचे कार्यक्षेत्र हे पुणे जिल्हा व पुणे जिल्हा लगतचे अहमदनगर, ठाणे, सातारा व सोलापूर जिल्हे व त्यांच्या भौगोलिक क्षेत्रापुरते मर्यादित राहील. | रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया यांचे मार्गदर्शक सुचना व बँकेच्या व्यवसाय वाढीसाठी |

### कालनिहाय थकबाकी (३१/३/२०२१ अखेर)

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशील | खाते संख्या | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | एक वर्षापर्यंत | ३९८ | २७२.१४ |
| २. | एक ते दोन वर्षापर्यंत | ४१ | १८२.६९ |
| ३. | दोन ते तीन वर्षापर्यंत | ३४ | २१०.२१ |
| ४. | तीन ते पाच वर्षापयंत | ८७ | ५९१.५५ |
| ५. | पाच वर्षापेक्षा जास्त | ८८ | १३९५.८५ |
| | **एकूण** | **६४८** | **२६५२.४४** |



## भावपूर्ण श्रध्दांजली






कै. चंद्रकांत कासट    कै. तुकाराम काळे    कै. रंजना पारेख    कै. उल्हास लोंढे





कै. कैलासचंद शहा    कै. राजाभाऊ पांडे    कै. दिगांबर गांजाळे

कै. सुभाषजी चोरडिया, कै. सुयोग खैरे, कै. अरविंद लंबे, कै. राजेंद्र तांबे, कै. मंगेश डेरे, कै. विश्वजीत वाजगे, कै.चंद्रभान कोठारी, कै. अमित कोन्हाळे, कै. जनार्दन वाव्हळ, कै. सुनिल वाव्हळ (सर), कै. इंदुबाई गाडेकर, कै. अजय गाडेकर तसेच अहवाल सालात दिवंगत झालेले सभासद, हितचिंतक, ग्राहक, थोर समाजसेवक, भारतमातेच्या रक्षणार्थ आपल्या प्राणांची आहुती देणारे लष्करी जवान, देशातील कोविड १९ या संसर्गजन्य आजाराने दिवंगत झालेले सामाजिक कार्यकर्ते, जागतिक व भारतीय किर्तीचे शास्त्रज्ञ, वैज्ञानिक थोर साहित्यीक, शिक्षणतज्ञ, ज्ञात-अज्ञात थोर विचारवंत, दिवंगत व्यक्तिंना भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करत आहोत.

ईश्वर मृतांच्या आत्म्यास शांती देवो! **ॐ शांती !** **ॐ शांती !!** **ॐ शांती !!!**

**लाला अर्बन को. ऑप. बँक लि. नारायणगाव**

सर्व संचालक मंडळ, सभासद, खातेदार व सेवक वृंद